# [illegible]

## समारोप

महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत आगरकरांनी जी कामगिरी बजावली, ती त्यांच्या उत्कट अशा देशभक्तीला आणि विवेकनिष्ठ प्रगतिपरतेला साजेशीच होती. या देशात इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर येथील बाह्य परिस्थितीत हळूहळू बदल होऊ लागला होता. परंतु आपल्या समाजाच्या जाणिवा मात्र जुन्या मध्ययुगीन जीवनाच्या चाकोरीतच बंदिस्त होऊन राहिल्या होत्या. त्याचप्रमाणे इंग्रजी ज्ञान संपादन केलेली जी काही विचारवंत मंडळी होती ती लोकांच्या पूर्वग्रहांचे समर्थन करीत होती आणि लोकसंग्रह करीत होती. परंतु हा मार्ग आगरकरांना मान्य होणे कदापिही शक्य नव्हते. त्यांची अशी भूमिका होती की, अस्तित्वात असलेल्या लोकमतातील दोषास्पद दाखविण्याचे व समाजातील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढे आणण्याचे अनभिमत काम करण्यास कोणी तरी तयार झालेच पाहिजे. ते करण्यास लागणारे धैर्य ज्या समाजातील काही व्यक्तींच्याठायी अंगी नसेल त्या समाजांनी वर डोके काढण्याची आशा कधीही करू नये, अशी त्यांची धारणा होती. म्हणून या आधुनिक युगप्रवर्तकांना लोकांनी सामोरे जावे म्हणून जे वास्तविक सत्य व श्रेयस्कर असेल ते त्यांना परखडपणे सांगण्याचे व्रत आगरकरांनी अंगिकारले होते आणि लोकांच्या स्तुतिनिंदेची भीती न बाळगता ते काटेकोरपणे व निष्ठेने अखेरपर्यंत चालू ठेवले. तसे पाहिले तर आगरकरांच्या विचारप्रणालीचा आशय निःसंशय क्रांतिकारक होता. आपल्या सामाजिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची त्यांची इच्छा होती. रूढिनिष्ठा, शास्त्रप्रामाण्य, जन्मसिद्ध अधिकार भेद इत्यादी परंपरागत कल्पनांचा त्याग करून व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, सामाजिक समता यांसारखी नवोदित तत्त्वे आपण आत्मसात केली पाहिजेत असे त्यांनी आपल्या देशबांधवांना शिकवण दिली होती. आगरकर हे जरी आधुनिकतेचे पुरस्कर्ते होते, तरी भारतीय संस्कृतीत अभिमानास्पद असे काहीच नाही अशा तऱ्हेचा न्यूनगंडाचा त्यांच्या मनात लवलेशही नव्हता. उलट जुन्या परंपरेतील जीर्णांश काढून

टाकताना तिच्यातील चैतन्यतत्व लुप्त होऊ न देण्याची आपण काळजी घेतली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. जगात कुठेही जे काही चांगले असेल ते आपण अवश्य ग्रहण केले पाहिजे. परंतु प्रत्येक बाबतीत परकीयांचे अंधानुकरण करणे हे त्यांच्या मते गुलामी मनोवृत्तीचे लक्षण होते. परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामाजिक जीवनाचे सातत्य टिकून धरण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती. कितीही मोठमोठ्या सुधारणा अंमलात आणावयाच्या झाल्या, तरी त्या करताना ज्याची सुधारणा करावयाची ते आपले स्वत्व म्हणजेच ' [illegible] ' आपण सदैव अबाधित राखले पाहिजे असा आगरकरांचा विशेष दृष्टिकोन होता.

अंतिम उद्दिष्टांची आपल्याला स्पष्ट कल्पना नसेल तर आपली सामाजिक सुधारणेची वाटचाल योग्य दिशेने होणार नाही, आपण निघालो कुठून, सध्या कुठे आहोत आणि पुढे पुढे जायचे आहे याचा स्पष्ट व सम्यक आलेख आपल्या दृष्टी-समोर नसेल तर आपल्या सुसंबद्धता व एकसूत्रीपणा राहणार नाही, तात्कालिक सुधारणा आणि अंतिम उद्दिष्ट यांचा आपल्याला नीट मेळ घालता येणार नाही, असा आगरकरांचा दृष्टिकोन होता. त्याचप्रमाणे जुन्या नव्याचा समन्वय साधण्याच्या पद्धतीचे आगरकरांना यत्किंचितही आकर्षण नव्हते. जी स्वयंवरे नाहीत ते सर्व बालविवाहच आहेत असे आम्ही समजतो. विवाहाच्या वयोमर्यादेचा प्रश्न तर विचारात घेतला पाहिजेच, पण त्यापेक्षाही वधूवरांचे निवडस्वातंत्र्य हे कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे असे आगरकरांनी निक्षून सांगितले आहे. तात्त्विक विवेचनातून यत्किंचितही शब्दच्छल येऊ न देता निर्भिडपणे संपूर्ण सत्य सांगण्याची जरी प्रतिज्ञा होती, तरी केवळ सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष व्यवहारात उतरवताना दूरगामी दृष्टीने जरा ती तडजोड करण्यास त्यांची मुळीच ना नव्हती. संमती वयाच्या कायद्याचा म्हणण्या-सारखा उपयोग होणार नाही असे त्यांचे मत होते. परंतु परकीय सरकारच्या हातून बालविवाह प्रतिबंधक कायदा होण्याची शक्यता नाही असे दिसून येताच संमतिवयाच्या बिलाचे त्यांनी निःसंकोचपणे स्वागत केले. वधूवरांनी स्वतःच परस्परांच्या संमतीने आपला विवाह ठरविण्याची प्रथा आपल्या समाजात रूढ होणे किती दुरापास्त आहे

ते आगरकर ओळखून होते. या दृष्टीनेच विवाहाच्या वयोमर्यादेचे जे वेगवेगळे पर्याय पुढे आले होते, त्यापैकी चौदा वर्षांची मर्यादा, स्वयंवराच्या आधीचा एक टप्पा म्हणून त्यांनी ग्राह्य मानली होती.

आगरकरांची सारी भिस्त, लोक शिक्षणावर, लोक जागृतीवर होती. त्यांना सामोपचारा इतकीच संघर्षाचीही आवश्यकता वाटत होती. मात्र त्यांना अभिप्रेत असणारा संघर्ष हा विचारसंघर्ष होता. आपल्या सामाजिक आचार-विचारांतील रूढिप्रियतेवर व पुराणमतवादावर चौफेर हल्ला चढवून लोकांना जाग आणण्याचा आगरकरांचा प्रयत्न होता. कोणतीही नवी अपरिचित कल्पना कानी पडताच आपले लोक एकदम बुजतात हे खरे आहे. परंतु तीच कल्पना पुन्हा पुन्हा ऐकण्यात आली की, त्यांचा बुजरेपणा आपोआप कमी होतो, आणि अंतर्मुख होऊन ते तिच्यासंबंधी विचार करू लागतात असा आगरकरांचा युक्तिवाद होता. सामाजिक प्रगतीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करणारे कार्यकर्ते लागतात. लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारे आगरकरांसारखे रूढिभंजक समाज सुधारक हवे असतात.

प्रि. गोपाळ गणेश आगरकर हे सामाजिक सुधारणांचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी सर्वांगीण सुधारणांचा पुरस्कार केला होता. तथापि आपल्या राजकीय स्वातंत्र्याच्या नाशास आपली अनेक सामाजिक रूढी जबाबदार असून पुन्हा राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आणि मिळविलेले स्वराज्य टिकविण्यासाठी सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे लोकजागृती करून समाज सुधारणेस लोकमत अनुकूल बनविण्याचा प्रयत्न केला. ` इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार ` या बाण्याने आगरकरांनी आयुष्यभर वाटचाल केली. समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी प्रसंगी परकीय सरकारचे सहाय्य घ्यावे, जरूर तर कायदा करून सुधारणा अंमलात आणाव्यात अशी आगरकरांची भूमिका होती. आगरकरांनी विविध सामाजिक

प्रश्नावर व्यक्त केलेल्या मतांपैकी कित्येक मते त्यांच्या काळाच्या पुढे होती. त्यांना आपल्या पुरोगामी विचाराबद्दल तत्कालीन समाजाकडून अवहेलना, उपेक्षा, अपमान याच गोष्टी त्यांच्या वाट्याला आल्या. तत्कालीन समाजातील सनातनी लोकांनी आगरकरांची संमतीवयाच्या बिलासंबंधीची पुरोगामी मते सहन न झाल्यामुळे त्यांची प्रेतयात्रा काढली. काही वर्णनांच्या मते आगरकरांनी आपल्या डोळ्यांनी आपली प्रेतयात्रा पाहिली. तथापि यशोदाबाई आगरकरांनी इ.स. १९२४ मध्ये कथन केलेल्या आठवणींमधून वरील विधान निराधार असल्याचे स्पष्ट होते. यशोदाबाईंच्या मते प्रेतयात्रेचे प्रकरण उद्भवले तेव्हा आगरकर पुण्यातच नव्हते तर ते कऱ्हाडला गेले होते.

गोपाळ गणेश आगरकर हे प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत होते. त्यांची स्वातंत्र्यविषयक कल्पना व्यापक होती. लो. टिळकांच्या मते राजकीय क्षेत्रात आगरकर संपूर्ण स्वातंत्र्यवादी होते. तसेच त्यांचा संपूर्ण पोशाख स्वदेशीचे प्रतीक असे. गोपाळ गणेश आगरकरांच्या विचारांचा महाराष्ट्राच्या सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक जीवनावर दूरगामी परिणाम झाला.

भारतातील इतर प्रांताशी तुलना करता महाराष्ट्र सामाजिक सुधारणेच्या बाबतीत आघाडीवर आहे याचे बरेचसे श्रेय रानडे, फुले, आगरकर इत्यादी निष्ठावंत सुधारकांना द्यावे लागेल. रानडे-आगरकरांनी ज्यांचा सतत पाठपुरावा केला, त्यापैकी बऱ्याचशा सुधारणा आज अंमलात आल्या आहेत. स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊन सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक कर्तबगार स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागल्या आहेत. विवाहाची वयोमर्यादा वाढत गेल्याने बालविधवांचा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही. पुनर्विवाह अजून सर्रास रूढ झालेले नाहीत, तरी त्यांना आता कुणी उघड विरोध करीत नाही. मात्र व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, सामाजिक समता इत्यादी उदारमतवादी मूल्यांवर आधारलेला आगरकरांचा ऐहिकनिष्ठ राष्ट्रवादी दृष्टिकोन आपल्या समाजाने मनोमन स्वीकारला आहे असे म्हणता येत नाही. १८९५ हे साल महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात पिछेहाट

करणारे ठरले आहे असे समजले जाते. कारण १८९५ साली च आगरकरांचा मृत्यू झाला आणि आगरकरांच्या मृत्यूनंतर तर सामाजिक सुधारणेचे बळकट मागे पडून सुशिक्षित मध्यम वर्ग जहाल राष्ट्रवादाकडे अधिकाधिक आकृष्ट झाला. त्याच वर्षी सामाजिक परिषदेची काँग्रेसच्या मंडपातून हकालपट्टी करण्यात आली. सामाजिक परिषदेच्या स्थापनेपासून तिचे वार्षिक अधिवेशन राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनानंतर त्याच मंडपात होत असे. मात्र १८९५ साली टिळक प्रभृतींच्या विरोधामुळे राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद यांची फारकत झाली. राजकीय व सामाजिक सुधारणांचे प्रवाह अलग अलग झाले यामुळे आपल्या सामाजिक जीवनातील मूलभूत समस्या तशाच कायम राहिल्या आहेत. जातीय भावनेचे प्राबल्य कमी झालेले नाही. अस्पृश्यतेचा प्रश्न वास्तव गुंतागुंतीचा व अवघड होऊन बसला आहे. सर्व-सामान्य लोकांतील धर्मोन्मादपणाचे प्रस्थ नाहीसे झालेले नाही. इतकेच पुढारलेल्या वर्गातील सुशिक्षित तरुणाही आधुनिक बळणाच्या बुवाबाजीच्या आहारी जात असल्याचे आढळते. राजकारणात संधिसाधूपणाच्या, भ्रष्टाचाराच्या व हुकुमशाहीच्या प्रवृत्ती बळावत चालल्या आहेत. म्हणून आगरकरांच्या व्यक्तित्वाबद्दल लोकांच्या मनात पूज्यभाव असला, तरी त्यांच्या तत्वप्रणालीचे यथायोग्य मूल्यमापन करून आपण त्यातील सत्यांश आत्मसात केला नाही हे कटू सत्य नाकारता येत नाही.

आगरकर आपल्या देशबांधवांना ज्या उदारमतवादाची शिकवण देत होते, तो युरोपात एका विशिष्ट परिस्थितीत उदयास आला होता. येथील नवोदित व्यापारी व कारखानदार वर्ग हे या तत्वप्रणालीचे पाठिराखे होते. मध्य-युगाच्या अखेरीस समुद्रावरील वाहतुकीच्या नव्या मार्गांचा शोध लागल्यामुळे इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, स्पेन, पोर्तुगाल इत्यादी देशांतील होतकरू व साहसी लोकांना व्यापाराच्या अभूतपूर्व संधी उपलब्ध झाल्या होत्या. या संधीचा तत्परतेने फायदा घेऊन पाहणारा जो ` नव्या मनूतील नव्या दमा ` चा व्यापारी वर्ग तेथे पुढे आला, त्याला सरंजामशाहीतील जुनी प्रस्थापित बंधने निरर्थक व अपायकारक वाटू लागली, म्हणून मध्ययुगीन रूढी, विचार आणि परंपरा यांच्याविरुद्ध त्याने बंडाचे निशाण उभारले. सोळाव्या शतकातील धर्मसुधारणेची चळवळ, फ्रान्समधील

राज्यक्रांती आणि इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती यशस्वी करण्यात या वर्गाचा मोठा वाटा होता. या लढ्यात सर्वसामान्य लोकांची सहानुभूती आपल्या पाठीशी असावी म्हणून त्यांनी स्वातंत्र्य, संधिसमानता, बुद्धिप्रामाण्य या मूल्यांचा वारंवार उद्घोष केला. व्यवसाय स्वातंत्र्य, मुक्त स्पर्धा, करारांचे बंधन इत्यादी औद्योगिक युगातील नवी तत्त्वे त्यांच्या उत्कर्षाला पोषक होती. तेव्हा आपल्या सामाजिक व्यवहारात त्यांची स्थापना व्हावी म्हणून या नवोदित वर्गाने अतोनात धडपड केली.

महाराष्ट्रातील उदारमतवाद हा येथील विकासोन्मुख वर्गाच्या बदलत्या गरजांमधून निर्माण झालेला नव्हता. इंग्रजांची कायदेपद्धती आणि पाश्चात्य विद्येचे संस्कार यांमधून ऐहिकनिष्ठा, धर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्व, व्यक्तिविकास, सामाजिक न्याय या मूल्यांची आपल्या लोकांना प्रथम ओळख पटली. इंग्रजी शिक्षणामुळे इंग्लंडसारख्या प्रगत राष्ट्रातील आधुनिक विचारप्रवाहांचा येथील सुशिक्षितांना परिचय झाला, आणि सामाजिक प्रबोधनाच्या प्रेरणेने त्यांचा येथे प्रसार करण्याची त्यांनी मनापासून धडपड केली. परंतु महाराष्ट्रातील एकंदर परिस्थिती या नवविचारांच्या जोपासनेला अनुकूल नव्हती. कायद्याचे राज्य, व्यवसाय स्वातंत्र्य, स्पर्धेला सर्वत्र वाव, करारांचे प्रामाण्य ही तत्त्वे इंग्रजांची विधितत्त्वमीमांसा व शासनपद्धती यांमधून आपोआपच आपल्या देशातील व्यवहाराला प्रस्थापित झाली होती. त्यासाठी व्यापारी वर्गाला झगडा करावा लागला नाही. शिवाय महाराष्ट्रातील व्यापारी वर्ग बहुतांशी परप्रांतातून आलेला होता. मुंबई हे व्यापाराचे मुख्य केंद्र होते. मुंबईचे वातावरण पुणे व त्यासारखी महाराष्ट्रातील अनेक शहरे यांतील वातावरणाहून अगदी वेगळे होते. आगरकर ज्या वर्गाच्या विवेकबुद्धीला आवाहन करीत होते, तो वर्ग प्रायः उच्चवर्णीय सुशिक्षितांचा बुद्धिजीवी मध्यम वर्ग होता. ब्राह्मण, सारस्वत, प्रभू व अन्य जातींना फार पूर्वीपासून विद्याध्ययनाची परंपरा होती. इंग्रजी अमलाच्या सुरुवातीपासून लोकांनी पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण घेऊन सरकारी नोकरीचे क्षेत्र काबीज केले.

महाराष्ट्रातील सुधारकांच्या समन्वयवादी धोरणामुळे वैचारिक पातळीवरही आगरकरांना येथे निष्ठावंत अनुयायी मिळाले नाहीत. स्पेन्सरप्रमाणे आगरकर हे विज्ञाननिष्ठ होते. आपल्या विचारप्रणालीत त्यांनी धर्म आणि समाजव्यवस्था यांची पूर्णपणे फारकत केली होती. औद्योगिक संस्कृतीचा उदय झाल्यानंतर आता सामाजिक जीवनातील धर्माचे कार्य संपुष्टात आले आहे. यापुढे कोणत्याही अतिमानुष व अलौकिक अशा गूढ देवी घटनेचा आधार न घेता समाजातील नीती-अनीती, न्याय-अन्याय, हित-अहित इत्यादी गोष्टींचा निर्णय इहवादी मूल्यांच्या आधारे केला पाहिजे, अशी आगरकरांची धारणा होती. `मनुष्याचे ऐहिक सुखसंवर्धन ` हा त्यांच्या मूल्यविचारांचा मध्यबिंदू होता. परंतु येथील अन्य सुधारकांना ही त्यांची धर्मनिरपेक्ष इहवादी विचारसरणी श्रेयस्कर वाटत नव्हती. आपल्या सामाजिक प्रबोधनाला ज्यांनी प्रथम चालना दिली, त्यांपैकी अनेकांच्या मनावर वैज्ञानिक दृष्टीपेक्षा ख्रिस्तपुराणातील मानवतावादाचा प्रभाव अधिक होता. पाश्चात्य राष्ट्रांचे कर्तृत्व व संपन्नता यांमुळे दिपून गेलेल्या आपल्या सुशिक्षितांचा स्वाभिमान जागा करण्यासाठी महाराष्ट्रात १८७० नंतर पुनरुज्जीवनवादाची लाट उसळली. आपला धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, इतिहास, संस्कृती यांचे राष्ट्रीयत्वाच्या भावनेने संशोधन व पुनर्मूल्यमापन करण्यास प्रारंभ झाला. आपली प्राचीन व मध्ययुगीन परंपरा धर्माशी निगडीत होती. त्यामुळे या सांस्कृतिक पुनरुत्थानातून धर्मश्रद्धेचे पोषण झाले, एवढेच नव्हे तर पाश्चात्य हे भौतिकवादी, विज्ञाननिष्ठ व ऐहिक उत्कर्षाच्या मागे लागलेले, उलट आम्ही भारतीय अध्यात्मवादी, धर्मनिष्ठ व पारमार्थिक कल्याणाची चिंता वाहणारे अशी नवी अस्मिता व अभिनिवेश आपल्या समाजात निर्माण झाला. आपल्या देशातील सर्वसामान्य लोक राजकीय घडामोडींबद्दल शतकानुशतके उदासीन होते. पण धर्मकार्य म्हटले की त्याची मात्र त्यांना स्वाभाविक ओढ होती. तेव्हा राजकीय जागृतीच्या चळवळीसाठी येथील बहुतेक राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी धर्म व राष्ट्रीयत्व यांची वारंवार सांगड घातली. लोकमान्यांच्या अनुयायांनीच धर्माचा उदोउदो केला असे नाही, तर नेमस्त प्रागतिकांनीही त्याची महती गायीली आहे. वैयक्तिक व सामाजिक जीवनांतील

नैतिकता टिकून धरण्यासाठी धर्मश्रद्धेची व ईश्वरनिष्ठेची नितांत आवश्यकता आहे, असे न्यायमूर्ती रानडे यांचे ठाम मत होते. रानडे-भांडारकर हे केवळ तत्त्वचिंतक व समाजसुधारक नव्हते, तर ते प्रार्थना समाजाचे संस्थापक प्रवक्ते होते. त्यामुळे भौतिकवादाचे म्हणून काही तत्त्वज्ञान आहे हे असे कुणी ध्यानातच घेतले नाही. फार तर काय पण भौतिकवाद म्हणजे सुखवाद असेच आपल्यातील असंख्य लोकांची समजूत होती. तेव्हा आगरकरप्रणीत मानवतेच्या ऐहिक सुखवर्धनाची विचारसरणी येथे मान्यता पावली नाही यात काहीच आश्चर्य नाही. पाश्चात्त्य जीवनपद्धतीतील औद्योगिकरणाचे तंत्र आपण हस्तगत केले, पण त्यांच्या क्रांतिकारक विचारसंप्रदायापासून मात्र आपण चार पावले नेहमीच दूर राहिलो.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रानडे, आगरकर व टिळक या तीन थोर समाजचिंतकांच्या ज्या विचारप्रणाली येथे प्रचलित होत्या, त्यापैकी आगरकरांची विचारप्रणाली ही त्यातल्यात्यात आधुनिक मूल्यांचा ठाम, सातत्याने व सडेतोडपणे पुरस्कार करणारी होती. त्यांचा दृष्टिकोन व्यक्तिवादी होता हे निर्विवाद, परंतु आपल्या विचारांच्या मांडणीत त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजधारणा, व्यक्तिविकास आणि समाजोन्नती यांचा समतोल मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची समाजोन्नतीची कल्पनाही संकुचित नव्हती. समाजाच्या सर्व थरांतील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळाला पाहिजे, त्यांचे नैसर्गिक हक्क त्यांना निर्वेधपणे उपभोगता आले पाहिजेत असे आगरकरांना अगदी उत्कटतेने वाटत होते. श्रमिकांचे आर्थिक प्रश्न व व्यावसायिक अडचणी आणि सामाजिक विषमतेमुळे होणारी शूद्रातिशूद्रांची कुचंबणा व मानहानी यांची त्यांनी प्रसंगपरत्वे दखल घेतली आहे, आणि त्यांबाबत आपले मत व्यक्त करताना त्यांनी सरकार व वरिष्ठ वर्ग यांची मुळीच भीडमुर्वत ठेवलेली नाही. तरी देखील त्यांच्या एकंदर लेखनातील बराचसा भाग उच्च वर्णातील मध्यमवर्गाच्या प्रश्नांनीच व्यापलेला आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांना स्वाभाविकपणेच त्यांचा व्यक्तिवादी दृष्टिकोन आणि त्यांच्या भोवतीचे उच्चवर्णीय वातावरण यांच्या मर्यादा पडल्या आहेत.

पुनर्विवाह, परदेशगमन यासारख्या प्रश्नावर जे हे दोन गट पडले त्यांतील लोक एकाच जातीतील किंवा घरातील होते व एकमेकांचे सोयरे होते. त्यामुळे यांच्यातील मतभेद युक्तिवादाने मिटण्याचा संभव होता, आणि ते तसे कालांतराने मिटले देखील. पण जातीनिर्मूलनाचा प्रश्न हा पुनर्विवाहाच्या प्रश्नाहून मूलत:च भिन्न स्वरूपाचा आहे. उच्चनीच भाव आणि अधिकारभेद हे जातिव्यवस्थेचे महत्त्वाचे विशेष होते. जाती नष्ट झाल्या तर उच्चवर्णीयांचे जन्मसिद्ध विशेषाधिकार आपोआपच संपुष्टात येणार हे उघड आहे. कोणताच गट वा वर्ग आपले परंपरागत अधिकार खुशीखुशी सोडण्यास तयार नसतो. कोणत्या ना कोणत्या रीतीने त्याची अडवणूक केली गेली तरच त्याच्याकडून खालच्या थरांतील लोकांना आपले हक्क मिळू शकतात. या बाबतीत मतपरिवर्तनाचा मार्ग हा बहुतांशी निष्फळच ठरतो. महात्मा जोतीराव फुले यांनी हे अचूक ओळखले होते. उच्चवर्णीयांचे नेते जेव्हा बहुजनसमाजातील लोकांना समाजहितासाठी झीज सोसण्याचा व कष्ट उपसण्याचा उपदेश करतात, तेव्हा त्यांच्या मनात नेमके कोणाचे हित साधावयाचे असते असा जोतीरावांचा सरळ सवाल होता. समाजजीवन हे वस्तुत: एकसंध व एकात्म नसून ते दुभंगलेले आहे. ब्राह्मण व शूद्रातिशूद्र, सावकार आणि कुळे, मालक व मजूर, शास्ते व शासित यांचे हितसंबंध एक नाहीत. प्रस्थापित कायदा, शासनपद्धती, सामाजिक नीती व निर्बंध, धार्मिक श्रद्धा व विधिनिषेध हे सर्व वरिष्ठ वर्गांच्या हितसंबंधांना पोषक असतात. तेव्हा ही समाजरचना बदलण्याच्या कामी उच्चवर्णीयांचे कधीकाळी सहाय्य मिळेल अशी आशा करण्यात अर्थ नाही. म्हणून त्यांची मनधरणी करीत न बसता शूद्रातिशूद्रांनी संघटितपणे झगडून स्वत:च्या बळावर सामाजिक गुलामगिरीतून आपली मुक्तता करून घेतली पाहिजे, अशी फुले यांची क्रांतिवादी विचारसरणी होती.

जोतीरावांनी आपल्या प्रचलित समाजव्यवस्थेचे जे सत्य स्वरूप उघड करून दाखवले आहे त्याची आगरकरांना अजिबात कल्पना नव्हती असे नाही. राजाचे किंवा श्रेष्ठ लोकांचे जे कल्याण ते साऱ्या राष्ट्राचे किंवा समाजाचे कल्याण ही कल्पना

संकुचित, अन्यायकारक व अनर्थावह आहे. ज्या समाजात ही प्रथा चालते त्यात सामाजिक व आर्थिक विषमता फैलावल्याशिवाय राहात नाही, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. आपली गा-हाणी दूर करून घेण्यासाठी कामगारांनी मजबूत संघटना बांधली पाहिजे अशी त्यांची शिफारस होती. आपल्या बेजबाबदार व लाचखाऊ सरकारी अधिका-यांचा द्रव्यलोभ व अरेरावीपणा यांवर त्यांनी सडेतोड कोरडे ओढले आहेत. पुरोहितशाही आणि श्रुतिप्रामाण्य यांचा तर त्यांनी आपल्या लेखांमधून वारंवार निषेध केला आहे. आजपर्यंत ब्राह्मणी संस्कृतीने शूद्रातिशूद्रांना अज्ञानावस्थेत ठेवण्याची जबाबदारी घेतली होती. परंतु आता ज्ञानाची द्वारे खुली होऊन त्यांचे डोळे उघडले आहेत. शूद्रादी वर्गात शिक्षणाचा जसजसा अधिकाधिक प्रसार होईल तसतसे त्यांना दास्यावस्थेतील सामाजिक वैषम्य टोचू लागेल आणि एक दिवस ते ब्राह्मणशाही विरुद्ध बंड करून उठतील असे उच्चवर्णीयांना त्यांनी बजावले होते. आगरकरांच्या या विवेचनावरून त्यांना सामाजिक जीवनातील अन्याय व विषमता किती तीव्रतेने जाणवत होती हे ध्यानात येते. स्त्री व पुरुष यांच्याप्रमाणे ब्राह्मण आणि अस्पृश्य यांच्यातील संबंधही समतेच्या तत्त्वावर आधारलेले पाहिजेत अशी त्यांची भावना होती. तरी देखील फुले यांच्या भूमिकेचे मर्म त्यांना पूर्णपणे उमगले होते असे दिसत नाही. आपले बुद्धिसामर्थ्य व नैतिक बळ एकवटून उच्चवर्णीयांची न्यायबुद्धी जागृत करण्यासाठीच त्यांची सारी धडपड होती.

आगरकर ज्या वर्गात जन्मले व वाढले, देशसेवेची दीक्षा घेतल्यानंतर त्यांना ज्या वर्गातील सहकारी लाभले, त्या वर्गाचे प्रश्न त्यांनी प्रथम हाती घेतले. मात्र या प्रश्नांची छाननी करताना त्यांनी सुट्या सुट्या सुधारणांपेक्षा समाज-परिवर्तनाचा मूलभूत प्रश्न कसा महत्त्वाचा आहे हे लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे आगरकरांचे लेखन राजकीय, सामाजिक, आर्थिक इत्यादी सर्व बाबतीत अप्रतिहत चालत होते. याच धर्तीवर आपल्याला असे म्हणता येईल की,

केवळ स्त्रियांच्या प्रश्नाबाबतच नव्हे तर बहुजन समाजाच्या प्रश्नांच्या बाबतीतही त्यांचे तर्कशुद्ध अग्रक्रम वाटत होते. बहुजनसमाज व दलित वर्ग यांच्यासंबंधीचे त्यांचे लेखन थोडेच आहे, परंतु तेवढेदेखील त्यांच्या तत्वप्रणालीतील क्रांतिकारकतेचा प्रत्यय आणून देण्यास पुरेसे आहे आणि यातच त्यांचे खरे मोठेपण आहे. तत्कालीन सुधारकांना संपूर्ण आगरकर पचविता आला नाही हे स्पष्ट आहे. पण त्यांच्यापैकी काही जणांनी जरी त्यांचा तत्त्वविचार आत्मसात केला असता तरी समाजसुधारणेची चळवळ उत्तरोत्तर व्यापक होत गेली असती. ` ब्राह्मणांनी विद्या ग्रहण केली व विद्येची ज्योत राखिली याबद्दल आम्ही त्यांचे कितीतरी अभिनंदन करावे. परंतु त्यावेळी नामदार रानडे, गोखले, आगरकर यांचे सारखे उदारमतवादी असते, तर खरोखरच त्यांनी सर्वांना विद्यादान दिले असते व आप्पलपोटेपणाने दुसऱ्यांना विद्या शिकवू नये असा जो प्रकार चालू होता त्याला आळा पडला असता, व ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा भेद राहिला नसता, व आज ब्राह्मणेतरांची म्हणून परिषद स्वतंत्र भरविण्याचा प्रसंग आला नसता.` हे शाहू महाराजांचे उद्गार या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहेत. बहुजन समाजातील विशेषत: दलित समाजातील तरुण जेव्हा वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टीने महाराष्ट्रातील विचारवंतांच्या ग्रंथांचे परिशीलन करू लागतील तेव्हा त्यांना त्या काळातील उल्लेखनीय विचारवंतांपैकी आगरकर हे आपल्याला सर्वार्थाने अधिक जवळचे आहेत असे वाटल्यावाचून राहणार नाही.

गोपाळ गणेश आगरकरांच्या जीवन कार्याचे कांही विचारवंतांनी पुढीलप्रमाणे मूल्यमापन केले आहे. थोर समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी ऑगस्ट १९५६ च्या ` नवभारत ` मध्ये लिहिलेल्या ` टिळक आणि आगरकर ` या आपल्या लेखात म्हटले आहे की, विचारांच्या बाबतीत आगरकर हे टिळकांपेक्षा मला जवळचे वाटतात. त्यांचा विवेकवाद, सामाजिक सुधारणाबाबत दिसून येणारी त्यांची निष्ठा व तळमळ यामुळे आगरकरांबद्दल मला विशेषच आदर, आपलेपणा व सह-अनुभूति वाटे. त्यांचे विचार मला ग्राह्य व अनुकरणीय वाटत. माझ्या पुनर्विवाहाच्या निमंत्रण पत्रिका

आगरकरांच्या सहीने निघाल्या होत्या ही गोष्ट त्यांच्या व आमच्यामधील आपलेपणाची निदर्शक म्हणून आम्ही किंवा अभिमानपूर्वक उल्लेख करावासा वाटतो. तेव्हा याप्रमाणे आगरकर हे इतरांच्या प्रमाणे नुसते बोलके सुधारक नव्हते तर बोलल्याप्रमाणेच कर्वे यांच्या पुनर्विवाहाच्या निमंत्रण पत्रिकेवर सही करून आपण प्रतिपादन केलेल्या तत्त्वाचे पालन करण्याचा प्रयत्न केला.

आगरकरांच्या मृत्यूविषयी नामदार गोपाळ कृष्ण गोखले लिहितात की, " एका थोर पुरुषाने शेवटची विश्रांती घेतली. त्यांच्या मृत्यूने पुणे किंवा महाराष्ट्रच नव्हे तर सर्व देशाला दैन्य आले.....जन्मतःच मोठेपणा मिळणे हे भाग्य थोर, पण मोठेपणा स्वतःच संपादन करणे हे अधिक थोर भाग्य. विद्वान पंडित, कळकळीचा देशभक्त, निर्भय नि जोरदार शैलीचा असा थोर पुरुष म्हणजेच आगरकर. त्यांच्यासारखी माणसे कित्येक वर्षांत एखादे वेळीच जन्माला येतात व म्हणूनच त्यांचा मृत्यू म्हणजे राष्ट्रीय आपत्ती होय. "

त्याचप्रमाणे पुणे येथील ' ज्ञान प्रकाश ' ने देखील आगरकरांचा गौरव केलेला आहे. ' ज्ञान प्रकाश ' मध्ये असे लिहिले होते की, लोकांना जागृत करणारे पुरुष राष्ट्राचे खरे उद्धारक होत यात शंका नाही. प्रपंचात राहून परोपकाराकरिता सर्वस्व अर्पण करणाऱ्या अशा व्यक्ती फारच दुर्मिळ असतात. अशा दुर्मिळ व्यक्तीत प्रिन्सिपॉल आगरकर यांची गणना होती....गोपाळरावजींनी सामाजिक सुधारणेची एक बाजू हाती घेऊन लिहिलेले विवेचन इतक्या सुंदर, मनोरंजक व जोरदार भाषेत करण्यास प्रारंभ केला की सुधारणा विरुद्ध पक्षाचे लोकदेखील सुधारकाचा अंक केव्हा हाती येईल याची मोठ्या उत्कंठेने मार्गप्रतीक्षा करीत......

प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांनी मांडलेले सामाजिक विचार महाराष्ट्रीय समाजाच्या जडणघडणीस अत्यंत उपयुक्त ठरले. महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासातील त्यांचे स्थान अद्वितीय आहे.